महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मासं/रवका/न.क्र.०५
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६५४ दि. १७.०३.२०२३

**विषय: आकस्मिक आजारांमध्ये "म्युकरमायकोसीस" या नवीन आजाराचा समावेश करणेबाबत.**

म.रा.वि.मंडळ, सामान्य आदेश क्र.२० (क) दि.१७.०६.१९६३ अंतर्गत मंडळाच्या कर्मचऱ्यांकरीता वैद्यकीय प्रतिपूर्ती व इतर लाभ देण्याची तरतुद यापूर्वी केलेली आहे, सदर तरतुदी सद्याच्या महावितरण कंपनी अंतर्गत देखील लागू केलेल्या आहेत. याबाबतीत सामान्य आदेश क्र.२० (क) दि.१७.०६.१९६३ चे सुधारपत्र क्र.५९ दि.२०.०८.१९९४ व सुधारपत्र क्र.६२ दि.१०.०५.१९९४ व तद्नंतर स्थापित म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रशासकीय परिपत्रक क्र.६२२ दि.०३.०३.२०२१ अन्वये अनुक्रमे गंभीर वैद्यकीय आजार, कराव्या लागणाऱ्या शस्त्रक्रिया आणि आकस्मिक आजारांची यादी प्रसृत करण्यात आलेली आहे.

२. आता, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-२०२१/प्र.क्र.९५/राकावि-२ दि.०५.०१.२०२३ अन्वये आकस्मिक आजारांमध्ये खालीलप्रमाणे आणखी नव्याने १ (एक) आजाराचा समावेश करण्यात आलेला आहे.

**(२९) "म्युकरमायकोसीस"**

३. सबब, मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन), संचालक (वित्त), संचालक (वाणिज्य) संचालक (प्रकल्प), व संचालक (मासं) यांचेशी विचारविनिमय करून **"म्युकरमायकोसीस"** हा आजार शासन निर्णय दि.०५.०१.२०२३ च्या धर्तीवर, म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील आकस्मिक आजारांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे. याप्रकरणी खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

क) म.रा.वि.मंडळ मधील सामान्य आदेश क्र.२० (क) दि.१७.०६.१९६३ चे सुधारपत्र क्र.५९ दि.२०.०८.१९९४ अंतर्गत व म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रशासकीय परिपत्रक क्र.६२२ दि.०३.०३.२०२१ अन्वये प्रसारित केलेल्या आकस्मिक आजारांच्या यादीमध्ये **"म्युकरमायकोसीस"** ह्या आजाराचा अनुक्रमांक **(१७)** वर नव्याने समावेश करण्यात आलेला आहे.

ख) सद्य:स्थितीत, कंपनीतील कर्मचारी यांना लागू असलेली Medi Assist (Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd.) या वैद्यकीय विम्याच्या अंतिम खर्चाच्या (Maximum Limit) पुढील होणारा सर्व खर्च सामान्य आदेश क्र.२० दि.१७.०६.१९६३ अंतर्गत "म्युकरमायकोसीस" या आजाराकरीता खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात येईल.

ग) शासन निर्णय दि.०५.०१.२०२३ च्या धर्तीवर, म.रा.वि.वि.कं.मर्या. मध्ये सदर आदेश दि.२१.०५.२०२० पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहील.

४. तरी, सामान्य आदेश क्र.२० (क) दि.१७.०६.१९६३ चे सुधारपत्र क्र.५९ दि.२०.०८.१९९४ व म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रशासकीय परिपत्रक क्र.६२२ दि.०३.०३.२०२१ अंतर्गत आकस्मिक आजारांची एकत्रित सुधारीत यादी सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' अन्वये प्रसारीत करण्यात येत आहे. सांघिक कार्यालय तसेच क्षेत्रीय कार्यालयातील सर्व नियंत्रण अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, सदर प्रशासकीय परिपत्रक सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या **e-library** वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत**: १) परिशिष्ट 'अ' (आकस्मिक आजारांची यादी)
२) शासन निर्णय दि.०५.०१.२०२३.

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
४) कार्यकारी संचालक (मासं)/ (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) /(माहिती तंत्रज्ञान) / (मुख्य तपास अधिकारी)/ (मुख्य विधी अधिकारी) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासं-मासंव्यप्र) /(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी / मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई

(प्रशासकीय परिपत्रक क्र. ६५४ दि. १७.०३.२०२३ याचे परिशिष्ट 'अ')

परिशिष्ट 'अ'

## (ग) आकस्मिक आजारांची नावे

१) धनुर्वात (Tetanus)

२) अपघात (Accident)

३) अधान संलकक्षन (Shock syndrome)

४) रुदवासी आणि रक्त वाहीनीशी संबंधीत (Cardiological and Vascular)

५) गर्भपात (Abortions)

६) तिव्र उदर वेदना / आंत्र आवरोध (Acute Abdominal pains / Intestinal Obstruction)

७) निश्चेतनावस्था (Coma)

८) मनोविकृतीची सुरवात (Conset of Psychiatric disorder)

९) डोळयातील दृष्टीपटल सरकणे (Retinal detachment in the Eye)

१०) कान, नाक, व घसा यामध्ये विजातीय पदार्थ गेल्यामुळे निर्माण झालेले आकस्मिक आजार (Foreign Body in Ear, Nose and Throat emergency)

११) वायु कोथ (Gas Gangrene)

१२) ज्यामध्ये तातडीने शस्त्रक्रीया करणे आवश्यक असते अशा जन्मजात असंगती (Cogonital Anamolies requiring urgent Surgical intervention)

१३) एड्स

१४) भाजणे

१५) ब्रेन टयुमर

१६) कोविड - १९ (COVID-19)

१७) म्युकरमायकोसीस

**आकस्मिक आजारांमध्ये "म्युकरमायकोसीस"**
**<u>या नवीन आजाराचा समावेश करणेबाबत.</u>**

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः वैखप्र-२०२१/प्र.क्र.९५/राकावि-२

गोकुलदास तेजपाल रूग्णालय आवार, संकूल इमारत
१० वा मजला बी-विंग, मंत्रालय, मुंबई - ४००००१
दिनांक : ०५ जानेवारी, २०२३

**<u>वाचा -</u>**

**१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३, दिनांक १९ मार्च, २००५.**

**२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. वैखप्र-२०१९/प्र.क्र.२३६/राकावि-२, दिनांक २७ मार्च, २०२०.**

**३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. वैखप्र-२०२०/प्र.क्र.६६/राकावि-२, दिनांक १७ डिसेंबर, २०२०.**

**४) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. वैखप्र-२०२०/प्र.क्र.६६/राकावि-२, दिनांक ३० एप्रिल, २०२१.**

**५) अधिसूचना क्रमांक : कोरोना-२०२०/प्र.क्र.९७/आरो-५, दि.२१ मे, २०२०**

**<u>प्रस्तावना :-</u>**

संदर्भ क्र.१ येथील दि.१९ मार्च, २००५ च्या शासन निर्णयान्वये शासकीय कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीकरीता आकस्मिक तसेच गंभीर आजारांची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर यादीतील गंभीर आजारांच्या संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये आणखी सहा गंभीर आजारांचा समावेश करण्यात आला असून संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये आकस्मिक आजारांमध्ये "कोविड-१९" या नवीन आजाराचा समावेश करण्यात आला आहे. सदर यादीतील आकस्मिक आजारांमध्ये "म्युकरमायकोसीस" या आकस्मिक आजाराचा नव्याने समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

आता सदर शासन निर्णयान्वये, संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय, दि.१९/०३/२००५ व संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णय, दि.१७/१२/२०२० अन्वये शासन विर्निदिष्ट करण्यात आलेल्या आकस्मिक आजारांमध्ये खालीलप्रमाणे आणखी नवीन १ (एक) आकस्मिक आजाराचा समावेश करण्यात येत आहे.

**(२९) "म्युकरमायकोसीस"**

२. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७१/सेवा-५, दि.०६/१२/२०२२ नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

३. सदर आदेश दिनांक २१ मे, २०२० पासून पुर्वलक्षी प्रभावाने लागू राहतील.

४. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०१०४१७२२१५९२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH MADHUKAR LAD

Digitally signed by MAHESH MADHUKAR LAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=25beab36016c9d18b34e813ce2c51ae3ba862f5ee940326a80ef8dfa067b2f3b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2B0B7B24B48EA4D47E171EF81F64A0D535EBB08400DA6060265D4872BADAEACA, cn=MAHESH MADHUKAR LAD
Date: 2023.01.05 14:50:01 +05'30'

**महेश म.लाड**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
२) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुबई,
३) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव,मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
५) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७) मा.मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८) मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१०) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
११) सेंटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लफ लँड रेकॉर्डस, पुणे,
१२) विभागीय आयुक्त (सर्व),
१३) जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे),
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद,
१५) महालेखापाल-१ , (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई,

१६) महालेखापाल- २, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१८) सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१९) चीफ ऑडिटर लोकल फंड्स अकाऊंटस, मुंबई,
२०) सर्व कोषगार अधिकारी,
२१) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई,
२२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,
२३) संचालक, आयुर्वेद, मुंबई,
२४) संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई,
२५) व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटीकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई,
२६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई,
२७) सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व),
२८) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व),
२९) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
३०) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व),
३१) प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,
३२) प्रोथोनेटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,
३३) वित्त विभाग, (कार्यासन सेवा-५), मंत्रालय, मुंबई,
३४) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई,
३५) सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन),मंत्रालय, मुंबई,
३६) निवडनस्ती (राकावि-२), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनांना विनंती करण्यात येते की,त्यांनी सदर शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनांना पाठवाव्यात. तसेच, संबंधित कार्यासनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना पाठवाव्यात.